# स्वगत - मी सावित्रीबाई फुले बोलतीये

*सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून मुलांकडून हे सादरीकरण घेऊ शकता*

होय, मी सावित्री!

तुमची सावित्रीमाई.

3 जानेवारी 1831 चा तो दिवस, सातारा जिल्ह्याच्या नायगावात माझा जन्म झाला. आई लक्ष्मीबाई आणि वडील खंडोजी नेवसे यांची मी सर्वात मोठी मुलगी. त्या काळात लहान वयात लग्न व्हायचे. वयाच्या नवव्या वर्षीच माझा ज्योतिरावांशी विवाह झाला आणि मी झाले, सावित्री ज्योतीराव फुले.

एके दिवशी ज्योतिराव मला म्हणाले "सावित्री, शिक्षण हेच माणसाच्या सर्व प्रश्नावरचा उपाय आहे. त्यामुळे प्रत्येकाला शिक्षण मिळालाच पाहिजे" जोतिबांच्या विचारांना मी साथ दिली. पुण्यात आम्ही मुलींसाठी, अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या.पण हे काम सोपं नव्हतं . त्या काळाच्या कर्मठ लोकांनी आम्हाला किती त्रास दिला हे तुम्ही आजवर ऐकलंच असेल. मी तर चिखल, दगडांचा मारा सोसला. पण मुलींना शिकवायचं काम मी थांबवलं नाही. आम्हाला जो त्रास झाला त्याचं आज काहीच वाईट वाटत नाही, कारण सर्वांना शिक्षण मिळावं हे माझ आणि ज्योतिबांचं स्वप्न आज संविधानामुळे पूर्ण झालं आहे. आज भारतीय संविधानाने प्रत्येक मुला मुलीला शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिलाय हे पाहून खूप आनंद वाटतो.

मुलांनो त्याकाळी समाजात खूप वाईट प्रथा होत्या स्त्रियांना कमी लेखल जायचं , समाजात भेदाभेद पाळला जायचा. असंच एक दिवस मी आणि ज्योतिराव रस्त्याने जात होतो , पाहिलं तर काय? काही लोक , "पाणी वाढ ग माय... पाणी वाढ ग माय " अशी आरोळी देत दारोदार फिरत आहेत. पण तरीही त्यांना कोणी पाणी देत नव्हतं आणि जे द्यायचे तेही दुरून पाणी ओतायचे. मी ज्योतिबांना विचारलं ही माणसं कोण आहेत? त्यांना पाण्याची भीक का मागावी लागते? ज्योतिबांनी मला आपल्या समाजातला जातिभेद समजून सांगितला तेव्हा माझ्या डोळ्यातून पाणीच आलं. ज्योतिबांनी माझे डोळे पुसले आणि म्हणाले सावित्री आपण यांना पाणी देऊ आणि आम्ही आमच्या घरातला पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला.

सर्व माणसं समान आहेत. कोणीही श्रेष्ठ नाही आणि कोणीही कनिष्ठ नाही. हीच आमची शिकवण. सर्व माणसांना समानतेने आणि सन्मानाने जगता आले पाहिजे यासाठी आम्ही कार्य

केले. या आमच्या समतेच्या विचारांचे प्रतिबिंब आम्हाला भारतीय संविधानातच दिसते . आपलं संविधान सर्वांना समानतेची आणि सन्मानाची वागणूक देते. स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, काळा-गोरा असा कोणताच भेद करत नाही.

तेव्हा मुलांनो!तुम्हाला शिक्षणाचा मूलभूत अधिकार देणारं आणि कोणताही भेदाभेद न करता सर्वांना समानतेने राहण्याची शिकवण देणारं भारतीय संविधान तुम्ही समजून घ्या. आणि त्याप्रमाणे सर्वांशी वागा . तरच मला आणि ज्योतिरावांना खरा आनंद होईल . कारण तुम्हाला शिक्षण मिळावं म्हणून आम्ही खूप कष्ट सोसलेत . मुलांनो खूप शिका, मोठे व्हा, कारण ज्योतिबांनी सांगितले आहे..

विद्येविना मती गेली | मतीविना नीती गेली| नीतीविना गती गेली | गतीविना वित्त गेले| एवढे अनर्थ |एका अविद्याने केले.

धन्यवाद